महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तशिविकापु/विवि/राष्ट्रगीत गायन/२०२०/८८५ दिनांक १७/०२/२०२०

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित,
महाविद्यालये/संस्था,
पुणे विभाग.

संदर्भ : महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्रमांक. २०२०/प्र.क्र. ६०/तांशि-३, दिनांक १५ फेब्रुवारी २०२०.

महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये नामफलक तसेच संस्थेच्या माहितीबाबत वा अन्य विविध बाबींचे फलक लावण्यात आलेले आहेत. ब-याच शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात आलेले फलक इंग्रजी भाषेत असून मराठी भाषेत फलक लावण्यात आलेले नाहीत, असे निदर्शनास आले आहे. तरी या अनुषंगाने शासन स्तरावरून संदर्भांकित परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. (सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.)

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुणे विभागातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित, महाविद्यालये/संस्था यांना खालील प्रमाणे सूचित करण्यात करण्यात येत आहे.

०१. महाविद्यालये/संस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्यात यावेत.
०२. महाविद्यालये/संस्था यामध्ये ज्या ठिकाणी नामफलक इंग्रजी भाषेमध्ये लावण्यात आले आहेत तेथे सुध्दा सदर फलक इंग्रजी भाषेसह मराठी भाषेत लावणे आवश्यक राहील.

शासन परिपत्रकातील निर्देशांचे सर्व शैक्षणिक महाविद्यालये/संस्थाकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत संबंधीत महाविद्यालये/संस्थांचे प्राचार्य यांनी वैयक्तिक लक्ष देवून खात्री करावी व सर्वांनी अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास सादर करावा.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

C:\Users\ropune\Downloads\bhilave.docx

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्याबाबत....

## महाराष्ट्र शासन

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण - २०२०/प्र.क्र.६०/विशि-३,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १५ फेब्रुवारी, २०२०.

परिपत्रक:-

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये नामफलक तसेच संस्थेच्या माहितीबाबत वा अन्य विविध बाबींचे फलक लावण्यात आलेले आहेत. बऱ्याच शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात आलेले फलक इंग्रजी भाषेत असून मराठी भाषेत फलक लावण्यात आलेले नाहीत, असे निदर्शनास आले आहे. तरी, या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.:-

(१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विना अनुदानित/कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था, तसेच तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्यात यावेत.

(२) ज्या ठिकाणी नामफलक इंग्रजी भाषेमध्ये लावण्यात आले आहेत तेथे सुध्दा सदर फलक इंग्रजी भाषेसह मराठी भाषेत लावणे आवश्यक राहील.

(३) सर्व संचालक व संबंधीत विद्यापीठे यांनी त्यांच्या अधिनस्त महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांना उपरोक्त सूचना आपल्या स्तरावरुन तात्काळ कळवाव्या. तसेच सर्व महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

२. उपरोक्त निर्देशांचे सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत संबंधित संस्थेचे प्राचार्य/ सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी वैयक्तिक लक्ष देऊन खात्री करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२००२१७१७३५१६३६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=abbed59665277346850 8d937a99472988ebdda28db6c543b79abe527c99646f6, cn=Satish Jagdeorao Tidke
Date: 2020.02.17 17:36:48 +05'30'

( सतिश तिडके )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, जि. रायगड.
५. कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
६. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
७. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०.संचालक, कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
११.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२.उप सचिव (विशि/मशि/तांशि/साशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३.निवड नस्ती (विशि-३).